# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त यांचा शहरात पाहणी दौरा ; स्वच्छता, नागरी सुविधा आणि विविध प्रकल्पांची घेतली सखोल माहिती**

दिनांक 2 जुलै 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी शहरातील विविध नागरी सुविधा, स्वच्छता, उद्यान, मल:निसारण प्रकल्प आणि धार्मिक/सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करण्यासाठी दौरा केला. या दौऱ्याचा उद्देश म्हणजे शहराच्या विविध भागांतील कामांचा आणि स्वच्छतेच्या दृष्टीने सुरू असलेल्या उपक्रमांचा प्रत्यक्ष आढावा घेणे आणि सुधारणा बाबत तात्काळ सूचना देणे हा होता. यावेळी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

पाहणी दरम्यान, आयुक्तांनी स्वच्छतेबाबत विशेष लक्ष दिले. काही ठिकाणी झाडांच्या छाटलेल्या फांद्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उचलण्याचे निर्देश दिले. इंद्रलोक येथील हजेरी चौकीला भेट देताना आयुक्त यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या हजेरी व्यवस्थेची तपासणी केली. त्यांनी 'वन क्लिक अटेंडन्स' प्रणाली कशी कार्यरत आहे, कर्मचारी वेळेवर उपस्थित राहतात का याचा आढावा घेतला. तद्नंतर इंद्रलोक परिसरातील कचरा संकलनाच्या ठिकाणी आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी केली. कचरा उचलण्याची वेळ, गाड्यांचे नियोजन या बाबींचा आढावा घेऊन नियोजित वेळेवर नियमित कचरा उचलण्याच्या सूचना दिल्या. तसेच, विमल डेअरी रोडवरील भाजी मार्केट परिसरातही आयुक्तांनी भेट दिली. या ठिकाणी स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन व विक्रेत्यांकडून पालिकेच्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याचे बारकाईने निरीक्षण केले. आयुक्त यांनी जेसल पार्क चौपाटी येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांनी केलेल्या निवेदनावर तात्काळ कार्यवाही करून आवश्यक कारवाई करण्याची सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिले.

मिरा रोड रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या युनिफॉर्म बदलण्याच्या खोलीची त्यांनी पाहणी केली. या ठिकाणी स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, प्रकाशयोजना व कर्मचारी सुविधा यांची तपासणी करून आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले. दौऱ्यात त्यांनी प्रगतीपथावर असलेल्या मल:निसारण केंद्र क्र. ६ ची सविस्तर पाहणी केली. या ठिकाणी सध्या सुरू असलेल्या यंत्रणेचे कार्यप्रणाली, कामाची गती आणि कामगार व्यवस्थापन यांचा आढावा घेऊन, या केंद्रात सौंदर्यीकरण आणि स्वच्छतेबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. केंद्राच्या परिसरात झाडे लावणे, सांडपाणी व्यवस्थापन सुधारणा करणे यावर भर देण्याचे सांगण्यात आले. आयुक्त यांनी मल:निसारण केंद्रालगत असलेल्या बॅकलेनची पाहणी करून रस्त्याची स्वच्छता आणि परिसरातील साफसफाईचा आढावा घेतला. व त्याठिकाणी सुधारणा करणेबाबत बांधकाम विभागास सुचना दिल्या.

आयुक्तांनी मिरा रोड येथील स्मशानभूमीची सुद्धा पाहणी केली. या ठिकाणी असलेल्या विद्युत दाहिनीच्या यंत्रणांची तपासणी करून त्याच्या नियमित देखभाल व कार्यक्षमतेबाबत संबंधित कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. विद्युत दाहिनीच्या परिसरातील स्वच्छता, टाकावू साहित्य व्यवस्थापन आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीबाबतही सूचना दिल्या. तसेच स्मशानभूमी लगत असलेल्या नाल्याची देखील पाहणी करण्यात आली. या दौऱ्याद्वारे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरी सुविधा, स्वच्छता, नागरिकांच्या सोयीसाठी कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासन राबवण्यावर मा. आयुक्तांनी विशेष भर देत, प्रत्येक विभागाने जबाबदारीचे पालन करावे असे स्पष्ट निर्देश दिले.